डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ दापोली.
मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता.दापोली,जि.रत्नागिरी. ४१५७१२

जा.क्र/मसकें/प्रअवा/२७५/२०२१. दिनांक ०९/०९/२०२१.

## जाहीर नोटिस

मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली येथे कार्यान्वित असलेल्या विक्री केंद्रामध्ये पांगारी, टेटवली, असोंड, रूखी, गावतळे या सर्व प्रक्षेत्रातुन विक्रीयोग्य शेतमाल गोळा करणे व सदर शेतमाल विक्री केंद्रामध्ये आणुन विक्री करणे तसेच प्रक्षेत्राला भेटी देणाऱ्या शेतकऱ्यांना प्रक्षेत्राची माहिती देणे ही कामे ठेका पध्दतीने पुर्ण करण्यासाठी ठेकेदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. सदर काम हे दिनांक ०९/१०/२०२१ ते २५/०३/२०२२ या कालावधीमध्ये करावयाची असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे दिला आहे. त्यासाठी ठेकेदारांनी एकुण कामांच्या स्वरूपाची प्रक्षेत्रावर पाहणी करून आपली दरपत्रके नोटीस प्रसिध्द झाल्यापासून दिनांक २७/०९/२०२१ रोजी सायंकाळी ०५.३० पर्यत किंवा त्यापुर्वी मा.संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली यांचे कार्यालयामध्ये पोहोच होतील अशा रितीने सादर करावीत.

❖ **मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली येथील विक्री केंद्रामध्ये करावयाच्या कामाचा तपशिल खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | कामाचा तपशिल |
|---|---|
| १) | मध्यवर्ती संशोधन केंद्र, वाकवली अंतर्गत वाकवली,पांगारी,टेटवली,असोंड,रूखी,गावतळे या प्रक्षेत्रातुन विक्रीयोग्य शेतमाल गोळा करणे. सदर शेतमाल विक्री केंद्रामध्ये विविध विभागांकडून आणून त्याची विक्री करणे. |
| २) | विक्री केंद्रामध्ये विक्री होणाऱ्या शेतमालाच्या नोंदी ठेवणे. |
| ३) | विक्री केंद्रामध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांना शेतीविषयक माहिती प्रक्षेत्रावरील उत्पादने आणि किरकोळ तांत्रिक सल्ला देणे इत्यादी सर्व कामे करणे. |
| ४) | विक्री केंद्रामध्ये विक्री करण्यासाठी विविध विभागातून आणलेली कलमे/रोपे यांना पाणी घालणे,तसेच विक्री केंद्राच्या परिसरात लागवड करण्यात येणाऱ्या भाजीपाला पिकांना पाणी घालणे, गवत काढणे तसेच त्यांना आवश्यकतेनुसार खते देणे व औषधे फवारणी करणे इत्यादी कामे मजुरांडून करून घेणे. |
| ५) | वेळोवेळी वरिष्ठांनी सोपवलेली इतर कामे करणे. |

❖ **पदासाठी अटी व शर्ती:–**

१ ठेका पध्दतीने काम करणाऱ्या उमेदवाराचे वय अर्ज केलेल्या दिनांकास ४४ वर्षापेक्षा अधिक असू नये. मागासवर्गीय उमेदवारासाठी शासकिय नियमांनुसार वयोमर्यादा शिथिल आहे.
२. सदर नियुक्ती ही फक्त ०६ महिन्यांसाठी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीची राहिल.
३. सदर तात्पुरता ठेका हा कामाचा उरक आणि अचूकता इत्यादी बाबींच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबुन राहील. तपासणी अहवाल आक्षेपार्ह असेल तर कोणतीही पुर्व सूचना न देता सदर ठेका रद्द करण्यात येईल व त्याबाबत कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही.
४. ठेकेदाराने त्याचा अर्ज संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली, ता. दापोली, जि. रत्नागिरी या कार्यालयामध्ये सादर करावयाचा आहे.
५. निवड झालेल्या ठेकेदारास रक्कम रू. १००/– च्या बॉन्ड पेपरवर हमीपत्र देणे बंधनकारक आहे.
६. ठेकेदाराने आपला राजीनामा द्यावयाचा झाल्यास राजिनामा हा एक महिना आधी लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक आहे. अन्यथा ठेकेदारास एक महिन्याचे वेतन या कार्यालयास जमा करावे लागेल.
७. सदर पदावरील नियुक्ती ही ठेका मजूरीवर असून डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठामध्ये कायम स्वरूपी नियुक्तीसाठी पात्र/हक्क प्राप्त नाही.
८. संचालक मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली यांना अपुर्ण अर्ज फेटाळण्याचा अधिकार राहिल.
९. जर ठेकेदार अर्ज दिनांकाच्या वेळी अन्य कोणत्याही कार्यालयात सेवेत असेल तर ठेकेदारास त्या कार्यालय प्रमुखाचा ना हरकत दाखला अर्जासोबत सादर करावा लागेल.

Scanned by CamScanner

१०.पोस्ट टपाल वाटपामधील उशिराबाबत हे कार्यालय जबाबदार असणार नाही.

११.सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या याचिका क्र. एसएलपी–५४४३/९० चे निर्णयानुसार या ठेका कालावधीनंतर विद्यापीठ सेवेत कायम स्वरूपी नोकरी मिळण्याबाबत ठेकेदाराचा कोणताही हक्क राहणार नाही.

१२. ठेकेदाराचे देयकातुन शासकिय नियमानुसार विविध करांची कपात केली जाईल.

१३. ठेकेदाराच्या देयकातून शासकिय नियमानुसार विविध करांची कपात केली जाईल. तसेच ज्या दिवशी ठेकेदार कामावर हजर असणार नाही त्याची त्या दिवसाची ठेका मजूरी रक्कम बिलातून वजा करण्यात येईल.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र,वाकवली
ता.दापोली,जि.रत्नागिरी.

प्रत माहितीसाठी सादर...

१.नोटिस बोर्ड मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली ता. दापोली,जि.रत्नागिरी.
२.नोटिस बोर्ड भाजीपाला सुधार योजना, मध्यवर्ती संशोधन केंद्र वाकवली ता. दापोली,जि.रत्नागिरी.
३.ग्रामपंचायत वाकवली/इनामपांगारी/सुखदर/कुंभवे ता.दापोली/खेड जि. रत्नागिरी.
४.एस.टी.स्टॅण्ड वाकवली, मु.वाकवली,ता.दापोली.
५ मा. प्रभारी अधिकारी, कृषि ज्ञान व्यवस्थापन कक्ष, डॉ.बा.सा.कों.कृ.वि.दापोली.